दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा | कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

वर्ष : ०१ ले ✻ अंक : २८ ✻ जालना ✻ ✻ शनिवार २९ ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻







# जालन्यातील जनहिताच्या प्रमुख प्रकल्पांना निधी उपलब्ध करा ; खा. डॉ. कल्याण काळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## घाणेवाडी तलाव दुरुस्ती, आयसीटी कॉलेज, पाणी पुरवठा, प्रदुषण नियंत्रणाच्या उपाययोजनेसाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी ; वाढत्या गुन्हेगारीवर आळा घाला, पोलीस ठाण्यांची संख्या वाढविण्याची केली मागणी

जालना, दि. २८ ऑगस्ट : जालना शहर व जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्याचे स्वतंत्र निवेदने देऊन तातडीने आवश्यक प्रशासकीय व निधीची तरतूद करण्याची मागणी केली आहे. औद्योगिक प्रदूषण, जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेचा विकास, हातवन बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी भूसंपादन, घाणेवाडी तलावाची दुरुस्ती तसेच शेतकरी कर्जमाफी यासारख्या प्रश्नांकडे खा. डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले असल्याची माहिती डॉ. डॉ. कल्याण काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. जालना शहर व परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वायू, जल व ध्वनी प्रदूषणाची समस्या गंभीर होत असल्याचे खासदार काळे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. एमआयडीसी परिसरातील गावांमध्ये नागरिकांना धूर, धुळीचे कण, पाण्यराच्या गुणवत्तेच्या तक्रारी तसेच श्वसनासंबंधी त्रास होत असल्याने स्वतंत्र व सखोल प्रदूषण तपासणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. औद्योगिक आस्थापनांचे विशेष ऑडिट करून नियमांचे उल्लंघन करणार्‍या उद्योगांवर कठोर कारवाई करावी, तसेच सांडपाण्याची नियमित तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या प्रलंबित बांधकामांना गती देऊन आवश्यक मनुष्यबळ व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी कार्यरत शिक्षकांना कायमस्वरूपी पदस्थापना, स्वतंत्र नोंदणी/आस्थापना व्यवस्था, पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी व मनुष्यबळ देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, जालना तालुका व जिल्ह्यातील हातवन बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही गतीने पूर्ण करून प्रकल्पाच्या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यास त्याचा फायदा जालना शहरासह परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा मिळून शेतकर्‍यांना दीर्घकालीन लाभ होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या घाणेवाडी तलावाच्या सांडव्यांची तातडीने दुरुस्ती करावी आणि तलावातील



गाळ काढण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही खासदार काळे यांनी केली आहे. सांडव्यांच्या भिंतींमध्ये गंभीर स्वरूपाच्या भेगा पडल्याने भविष्यात धोका निर्माण होण्याची शक्यता असून, अतिवृष्टी झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तलावातील गाळ साचल्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी झाली असून गाळ काढल्यास शहराच्या पाणीपुरवठ्याला मोठा फायदा होईल, असेही त्यांनी म्हटले आहे. यासोबतच राज्यातील पात्र शेतकर्‍यांना न्याय मिळावा यासाठी ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६’ अधिक सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. ३१ मार्च २०१९ पूर्वीची पात्र थकबाकी असलेल्या शेतकर्‍यांचा योजनेंतर्गत समावेश करावा, नियमित कर्जफेड करणार्‍या शेतकर्‍यांच्या प्रोत्साहनपर लाभाची कमाल मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवावी, जमीन वर्ग-२च्या कारणामुळे पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नयेत, तसेच कागदपत्रे व ओळख क्रमांकाच्या तांत्रिक अडचणींमुळे कोणताही पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

या सर्व प्रश्नांवर मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागांना तातडीने निर्देश देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि प्रलंबित कामांना गती द्यावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. सदरील पत्रकार परिषदेला राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, नंदू जांगडे, कृष्णा पा.पडूळ, संजय मुथा, नरेंद्र मित्तल, सुनील चौधरी, अब्दुल हाफिज, संजय इंगळे, शेख वासिम, अशोकराव उबाळे, राजेंद्र गोरे, अविनाश चव्हाण, रघुवीर गुढे, सोपान तिरुखे, ज्ञानदेव इंगोले, वासिम पठाण, भागवत घाटे, कलीम खान, कल्याण तारडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## जालना-वाटूर राज्य महामार्गाची मजबुतीकरण करा : माजी आ.चव्हाण

**सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना निवेदन; खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका**

जालना : जालना ते जिंतूर या महत्त्वपूर्ण राज्य महामार्गावरील जालना ते वाटूर दरम्यानच्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून कायमस्वरूपी मजबुतीकरण करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद बाजीराव चव्हाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. शिवेंद्रसिंह



भोसले यांना निवेदन देऊन रस्त्याच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. जालना ते वाटूर हा मार्ग परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक, शेतमालाची (पान ३ वर)

## मराठा-कुणबी प्रमाणपत्रांसाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाइन कक्ष

जालना, : मराठा समाजातील नागरिकांना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेत मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य मिळावे, यासाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र हेल्पलाइन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शासनाच्या निर्देशानुसार हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी नियुक्त अधिकारी





व कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे स्थापन करण्यात आलेल्या हेल्पलाइन कक्षाच्या माध्यमातून मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, कागदपत्रे व पुराव्यांबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. हेल्पलाइन कक्षासाठी नव्याने नियुक्त अधिकारी व कर्मचार्‍यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहीर केली आहे. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (गृह) परमेश्वर शिंदे, तसेच महसूल सहाय्यक संदिप इंगळे यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे.. नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळविताना आवश्यक असलेल्या पुराव्यांची माहिती उपलब्ध करून देणे, अर्जाची प्रक्रिया समजावून सांगणे, उपलब्ध अभिलेखांमधून आवश्यक नोंदी शोधण्यास मदत करणे तसेच अर्जदारांच्या अडचणींचे योग्य प्रकारे (पान ३ वर)

## ७ सप्टेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

जालना : जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ७ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसर्‍या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. ज्या अर्जदाराने तालूकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय यांनी कळविले आहे.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय (पान ३ वर)



## आ. अर्जुन खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे भोकरदन चौफुली उड्डाणपुलालगतच्या दोन्ही सर्व्हिस रोडसाठी ८.८८ कोटी मंजूर

जालना : जालना शहरालगतच्या देऊळगाव राजा-जालना-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील भोकरदन चौफुली येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या सर्व्हिस रोडच्या सुधारणा कामासाठी ८ कोटी ८८ लाख ५३ हजार ३२४ रुपयांची (जीएसटी वगळून) प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रत्यक्ष पाहणीपासून प्रस्ताव तयार करून घेणे, अधिकार्‍यांच्या बैठका घेणे आणि केंद्रीय स्तरावर मंजुरी मिळविणे या प्रत्येक टप्प्यावर केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे. भोकरदन चौफुलीवरील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या सर्व्हिस रोडची अत्यंत दुरवस्था झाल्याने वाहनचालक आणि परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. खड्डे, धूळ आणि वाहतुकीची कोंडी यांमुळे अपघाताचा धोकाही वाढला होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार खोतकर यांनी स्वतः रस्त्याची पाहणी केली आणि तातडीने डागडुजी करून वाहनधारकांना तात्पुरता दिलासा मिळवून दिला. केवळ तात्पुरत्या दुरुस्तीवर न थांबता या सर्व्हिस रोडची कायमस्वरूपी सुधारणा व्हावी, यासाठी आमदार खोतकर यांनी राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोलाच्या अधिकार्‍यांना तातडीने सविस्तर प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष शेलार आणि कार्यकारी अभियंता अविनाश चव्हाण यांच्यासोबत त्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन प्रस्तावाच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेतला. आमदार खोतकर यांच्या पाठपुराव्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाने सुधारणा कामाचा प्रस्ताव



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडे सादर केला. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी या मागणीला तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार कामासाठी ८ कोटी ८८ लाख ५३ हजार ३२४ रुपयांची (जीएसटी वगळून) प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सध्या या कामाची निविदा प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. सर्व्हिस रोडचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीची कोंडी कमी होऊन वाहनचालकांना सुरक्षित आणि सुकर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे मुख्य अभियंता संतोष शेलार, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता अविनाश चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकार्‍यांसोबत आमदार खोतकर यांनी अनेकदा बैठका घेतल्या. सर्व्हिस रोडच्या सुधारणा कामाचे अंदाजपत्रक तातडीने तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग, अकोला विभागाच्या अधिकार्‍यांनी कामाचे अंदाजपत्रक व प्रस्ताव तयार करून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. नितीनजी गडकरी यांच्या कार्यालयाकडे सादर केला. या प्रस्तावाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कामास मंजुरी देण्याचे आदेश दिले. त्यानंतर या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असू ८ कोटी ८८ लाख ५३ हजार ३२४ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामासाठी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले असे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शेवटी सांगितले.

# संपादकीय

## निर्भिड पत्रकार : लोकमान्य टिळक

आकाश जरी कोसळले, तरी मी कोसळणार नाही. त्या कोसळलेल्या आभाळावर उभा राहून ध्येयाकडे वाटचाल करीन, असा विचार ज्यांनी जनमनात रुजवला ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील थोर पुढारी, निर्भीड पत्रकार, संपादक, विद्यार्थीप्रिय शिक्षक, प्रतिभावंत लेखक,उत्तम वक्ते म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील सन १८९० ते १९२० हा काळ टिळक युग मानला गेल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वमान्य जनतेवर प्रभाव पडला. टिळक हे जहालवादी असून, इंग्रजांनी भारतास स्वातंत्र्य दिलेच पाहिजे व त्यासाठी त्यांच्याशी असलेले मतभेद उघड करून सर्व जनतेने आंदोलन केले पाहिजे अशी त्यांची विचारधारा होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाले'पासून तसेच कलकत्ता येथील 'अमृतबझार पत्रिकेचे संपादक शिरीषबाबू घोष यांच्यापासून प्रेरणा घेऊन लोकमान्य टिळक यांनी मराठी व इंग्रजी वृत्तपत्र काढण्याचे ठरवले. दि. २ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी व दि. ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' ही दोन वृत्तपत्रं प्रसिद्ध करून टिळक मराठी पत्रकारितेच्या परंपरेचे पाईक झाले. त्याकाळी ही 'केसरी'(मराठी) व 'मराठा'(इंग्रजी) हे साप्ताहिक स्वरूपात असून ते दर मंगळवारी पुणे येथून प्रसिद्ध होत असे. समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर हे १८८१ ते १८८७ या काळात केसरीचे संपादक तर टिळक हे १८८१ ते १९२० या काळात 'मराठा'चे संपादक होते.या पत्रात एरवीच्या वर्तमानपत्राप्रमाणे बातम्या, राजकीय प्रकरण, व्यापारासंबंधी माहिती वगैरे नेहमीचे विषय तर येतीलच पण या खेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका, वगैरे विषयांचा त्यात समावेश केला जाईल. तसेच विलायतेत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते ती इकडील लोकास समजणे अवश्य असल्यामुळे त्याचाही सारांश रूपाने यात संग्रह करण्याचा बेत केला आहे. असा मजकूर 'केसरीच्या' पहिल्या अंकात प्रसिद्ध झाला होता. या निवेदनाप्रमाणे टिळकांनी अखेरपर्यंत लेखन केले. वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील होत, हीच भूमिका केसरीच्या संपादकांनी अंगी बाळगली. कोल्हापूर गादीच्या प्रकरणात टिळक आणि आगरकर यांना चार महिने तुरुंगवास घडल्याने १८८४ पासून त्यांच्यातील मतभेद विकोपाला गेले आणि दि.२५ ऑक्टोबर १८८७ च्या केसरीच्या अंकात आगरकर यांचा केसरीचा संबंध नसल्याचे जाहीर केले.'केसरी' या वृत्तपत्राचा इतिहास हा केवळ एका वृत्तपत्राचा इतिहास नसून,तो जणू स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास आहे. केसरी या वृत्तपत्राला टिळकांनी जहाल राष्ट्रवादी चळवळीचे मुखपत्र म्हणून एक वेगळा आकार दिला. टिळकांची लेखणी ही निर्भीड व धारदार असून, इंग्रजांविरुद्ध राजकीय प्रबोधांचे एक शस्त्र म्हणून त्यांनी केसरीतून आपली लेखणी चालवली. त्यांची पत्रकारिता ही जणू त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा एक भाग होती. याची एक आठवण म्हणजे, दि.१५ जून १८९७ रोजी केसरीत 'शिवाजीचे उद्गार' ही कविता प्रसिद्ध झाल्यामुळे टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सुमारे दीड वर्षं कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी साहित्यसम्राट न. चिं. केळकर हे केसरीचे संपादक होते. वास्तविक ती कविता नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिली असली, तरी त्या लेखनाची जबाबदारी ही टिळकांनी स्वत:कडे घेतली व दि.२४ जून १९०८ रोजी टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांची शिक्षा होऊन त्यांना मंडालेच्या तुरुंगात पाठवले. टिळकांच्या अग्रलेखांचे मथळे हे जणू वाचकांना चक्रवून सोडत असत.'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का'?,'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे','उजाडले पण सूर्य कोठे'?, 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ','गोळी घाला की फाशी द्या','उत्तम गुराखी कोण'? हे त्यांच्या अग्रलेखांचे मथळे केवळ शोभेचे नसून, त्याकाळी ब्रिटिश राज्यकर्त्यांची रेवडी उडवताना सामान्य वाचकांना त्याद्वारे बोध मिळत असे. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' या त्यांच्या गाजलेल्या अग्रलेखाची सुरुवात करताना टिळक लिहितात, हा प्रश्न पाहून आमचे कित्येक वाचक केसरीकारांचे डोके ठिकाणावर आहे का? असा प्रश्न करतील, आम्ही काय म्हणत आहोत ते नीट ऐकून घेण्याबद्दल त्यास प्रथम विनंती करून नंतर विषयाकडे वळतो' अशा मार्मिक भाषेत ते लेखन करत असत. एखाद्या विषयाचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करून त्या विषयाचा निकाल लावेपर्यंत टिळक तो विषय सोडत नसत. ज्येष्ठ साहित्यिक वामन मल्हार जोशी यांनी केसरीविषयी असे मत मांडले आहे की,त्यांच्या (टिळकांच्या) लेखात प्रतीपक्षांना असह्य तेज असे. सांगोपांग विचार, बिनतोड युक्तिवाद, मुद्देसूद व सरल मांडणी, सुबोध व कोटीबाज भाषा अशा गुणांनी ते पुरेपूर भरलेले असायचे. लेख लिहिण्यापूर्वी त्या त्या विषयाची माहिती मिळवण्याबाबत टिळक बराच काळ दवडीत असत तर 'केसरी'तील टिळकांचे लेखन स्वदेश चळवळीला चांगलेच पूरक ठरत असल्याचे मत त्यांचे सहपत्रकार व 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांनी मांडले होते. एखाद्याचा मृत्यूलेख लिहिणे ही संपादकीय लेखनाची कसोटी असते. त्या व्यक्तीशी जरी काही मतभेद असतील तरी, ते त्यावेळी बाजूला सारून त्या व्यक्तीबद्दल टिळक भरभरून लिहीत असत. दि.१७ जून १८९५ रोजी गोपाळ गणेश आगरकर यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीच्या वेळी टिळकांना अश्रू अनावर झाले. आगरकरांची व त्यांची सख्खी मैत्री व घट्ट मतभेद असल्याने टिळकांनी केसरीत आगरकरांवर लिहिलेला मृत्यूलेख वाचून त्याकाळी सामान्य वाचकांना खऱ्या अर्थाने आगरकर यांची महती कळली. आगरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त टिळक त्यांच्यावर दरवर्षी लेख लिहीत असत. तसेच दि. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनाची बातमी जेव्हा टिळकांना समजली तेव्हा ते सिंहगडावर होते. त्यावेळी त्यांचे एक मित्र त्यांना गोखल्यांच्या घरी घेऊन आले. टिळक त्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी झाले व गोखल्यांची महती सांगणारे भाषण अंत्यविधीच्या प्रसंगी केले व त्वरित केसरीच्या कार्यालात जाऊन गोखल्यांच्या मनोनिग्रहाची प्रसंशा करणारा मृत्यूलेख त्यांनी केसरीत लिहिला. लेख लिहिताना त्यांनी भाषा सजवण्याची अगर रंगवण्याची खटपट कधीही न करता, आपल्या मनातील आशय किंवा स्फूर्तिदायक संदेश वाचकांच्या मनाला जाऊन कसे भिडतील याचा विचार करत. सडेतोडपणा व उत्कटता हा त्यांच्या भाषेचा अलंकार असून, जो वाचक त्यांचे लेख तादात्म्य बुद्धीने वाचन करील त्या वाचकाला टिळकांची टेबलावर बसून अग्रलेख लिहिणारी मूर्ती न दिसता, उभे राहून मोठ्या आवाजात महत्त्वाच्या शब्दांवर जोर देऊन बोलणारी मूर्ती नक्कीच दिसेल.

# नशामुक्तीचा संकल्प



नशामुक्ती अभियान आपल्या भारत देशाच्या शतक महोत्सवी स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत विकसित भारत होण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी देशातील सामाजिक परिस्थिती, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि सुशासन अशा विविध बाबींचा समावेश आहे. म्हणजे आपला देश एक विकसित राष्ट्र म्हणून ओळखला जाणार आहे; परंतु असे असले तरी त्या देशातील नागरिक नशामुक्त असले पाहिजेत तरच देश खऱ्या अर्थाने विकसित बनू शकतो. देशाच्या विकासासाठी नशामुक्ती होणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनजागृती झाली पाहिजे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०20 रोजी देशात नशामुक्ती भारत अभियान सुरू केले. प्रथम देशातील २७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते. सध्या ३७२ जिल्ह्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबविले जात आहे. आपल्या देशात सन २०२१ मध्ये ७५२ जिल्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश राज्यात सर्वात ७५ जिल्हे असून सर्वात कमी गोवा राज्यात २ जिल्हे आहेत, तर आपल्या महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत. तेव्हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्ती अभियान राबविणे गरजेचे आहे.

नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. एकीकडे मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध करणे आणि दुसरीकडे शासन मान्य देशी दारूचे दुकान म्हणून मान्यता देणे. त्याला सुजाण नागरिकांनी विरोध केल्यास शासनाचा महसूल बुडतो अशी आरडाओरड सुरू केली जाते. मात्र यावरती कायदेशीरपणे प्रतिबंध होणे गरजेचे आहे. यासाठी सामूहिक जागृती, पथनाट्य व पोस्टर्स लावून जनजागृती केली जात आहे. काही ठिकाणी तरुण पिढी बरबाद होऊ नये म्हणून दुकाने बंद करण्याचा प्रयत्न सुद्धा झाला. दारूची दुकाने काही दिवस बंद करण्यात आली. मात्र काही दिवसांनी पुन्हा दारूची दुकाने सुरू करण्यात आली. मादक द्रव्यांच्या सेवनाने गंभीर आजार, मानसिकदृष्ट्या खचून जाणे, कर्जबाजारी, शारीरिक समस्या अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत चालले आहेत. काही ठिकाणी मुलांना वडिलांच्या मादक द्रव्यांच्या सेवनाने शाळा शिकण्याची इच्छा असून सुद्धा घरची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अर्धवट शाळा सोडून तुटपुंज्या पगारावर बारा तास काम करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे देशातील दारिद्र्य निर्मूलन होणार नाही. यात गरीब अधिक गरीब होत जाणार आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार आहे. जर भारत सरकारला देश विकसित करायचा असेल तर ही आर्थिक दरी कमी करावी लागणार आहे. ज्या गरिबांसाठी योजना आहेत त्या गरिबांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तसेच त्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून द्यायला हवी. नशामुक्ती भारत अभियान राबविताना मादक द्रव्यांच्या सेवनाने जे दुष्परिणाम निर्माण होतात त्याची प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती होणे गरजेचे आहे. तेव्हा तरुणाई नशेच्या आहारी न जाता ग्रंथालयात गेले पाहिजेत. चांगल्या लेखकांच्या पुस्तकांचे वाचन करायला हवे. दररोज वर्तमानपत्रे वाचल्याने आपल्या परिसरातील घडामोडी समजून चांगल्या मार्गाचा अवलंब करू शकतो. म्हणजे नकळत असा बदल घडत असतो. हे भविष्याच्या दृष्टीने चांगले आहे. तेव्हा देशात विकासाच्या दृष्टिकोनातून नशामुक्ती भारत अभियान देशातील प्रत्येक जिल्ह्यात राबविणे गरजेचे आहे.

# गरजा विस्तारासाठी बँकांकडे कर्ज मागणाऱ्यांचे प्रमाण

आजघडीला भारताची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली आहे. अन्नधान्याची टंचाई केव्हाच दूर झाली आहे. परंतु तरीही आताचा काळ जागतिकीकरणाचा असल्यामुळे पूर्वीपेक्षा आता युद्धजन्य स्थितीचे फटकेही जास्त बसण्याची शक्यता असते. याचे कारण परदेशांतून भारतात येणाऱ्या पैशांपैकी ४० टक्के वाटा हा आखाती देशातून येतो. त्याचप्रमाणे उदारीकरणानंतर जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा हळूहळू वाढत आहे आणि वेगवेगळ्या वस्तूंची व सेवांची निर्यात भारत करू लागला आहे. युद्धाच्या वणव्यामुळे अमेरिकेतील इंधनदराने सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. युद्धापूर्वी तीन डॉलर प्रति गॅलनच्या खाली असलेले पेट्रोल दर चार डॉलरच्या पार गेले. तर मालवाहतुकीसाठी कणा मानल्या जाणाऱ्या डिझेलच्या किमतीत युद्ध सुरू झाल्यापासून ४७ टक्क्यांची वाढ झाली आणि त्याचे दर ५.५0डॉलर प्रति गॅलनपर्यंत पोहोचले. युरिया आणि खतांच्या किमती वाढल्याने अमेरिकन शेतकऱ्यांवर सुमारे ५0 हजार डॉलर्सचा अतिरिक्त बोजा पडला आहे. त्याचप्रमाणे कम्प्युटर चिप्स बनवण्यासाठी लागणाऱ्या हेलियम वायूचा ३५ टक्के पुरवठा कतारमधून होतो. हा पुरवठा थांबल्याने सिलिकॉन व्हॅलीतील टेक कंपन्यांवर मोठे संकट कोसळले आहे. रुग्णालयातील एमआरआय उपकरणासाठी हेलियम अनिवार्य असतो, ज्याची टंचाई आता दूर व्हायला हवी. होर्मुझची नाकेबंदी अधिक काळ सुरू राहिल्यास अमेरिकेमध्ये मंदी येणे अटळ आहे. अमेरिकेचा २०२६ मधील विकासदर २.६ टक्क्यांवरून थेट एक टक्क्यावर येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. याचा अर्थ अमेरिका पुन्हा एकदा १९७0च्या दशकातील 'स्टॅगफ्लेशन'सारख्या परिस्थितीत पोहोचू शकते. अशा परिस्थितीत विकासदर कमी आणि महागाई जास्त असते. शिवाय युद्ध थांबले तरी बंद झालेल्या तेलविहिरी पुन्हा सुरू होण्यासाठी अनेक महिने लागतात. तसेच युद्धात उद्ध्वस्त झालेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीला काही वर्षे लागू शकतात. त्यामुळे इंधन दर पूर्वीच्या स्तरावर येथे येण्याची शक्यता कमीच आहे. अमेरिकेची स्थिती अशी राहिल्यास भारतासारख्या मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशांनाही चटके बसणार, हे स्पष्ट आहे. वास्तविक, यापूर्वी देशांतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये पैशांचा ओघ वाढला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, सर्वसामान्य नागरिक असो वा मोठे उद्योग समूह, आपल्या गरजा आणि विस्तारासाठी बँकांकडे कर्ज मागणाऱ्यांचे प्रमाण वेगाने वाढत आहे.

# मनुष्य बळावर गदा

आखाती प्रदेशातील युद्ध हे केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित राहात नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. तेलसंपन्न आखाती देश जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे केंद्र असल्यामुळे तेथील अस्थिरता ही थेट आर्थिक अस्थिरतेत रूपांतरित होते. अशा युद्धपरिस्थितीत सर्वप्रथम फटका बसतो तो कच्च्या तेलाच्या किमतींना. तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या की वाहतूक, उत्पादन, वीजनिर्मिती अशा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. भारतासारख्या तेलआयात-निर्भर देशासाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. आयातीवरील खर्च वाढल्याने चालू खाते तुटीवर ताण आता येतो, रुपयाचे अवमूल्यन होते आणि सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट परिणाम होतो, तर उद्योगक्षेत्रासाठी उत्पादनखर्च वाढतो. परिणामी, बाजारातील मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम दिसून येतो. उत्पादनखर्च वाढणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होणे आणि जागतिक मागणीत घट होणे या कारणांमुळे कंपन्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होते. अनेक कंपन्यांना खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. त्यात नवीन प्रकल्पांना स्थगिती देणे, विस्तार योजनांना ब्रेक लावणे किंवा कर्मचाऱ्यांची कपात करणे यांचा समावेश असतो. अशा परिस्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राची जोखीम घेण्याची क्षमता कमी होते आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जातात. असे गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थितीचा वेध घ्यायला हवा. युद्धामुळे निर्माण झालेली अनिश्चितता ही गुंतवणूकदारांसाठी सर्वात मोठा अडथळा असते. देशांतर्गत तसेच परदेशी गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भांडवली बाजारातील विश्वास कमी होतो आणि नवीन गुंतवणुकीचा ओघ मंदावतो. परकीय गुंतवणूक घटल्यास तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक वाढ यांवरही नकारात्मक परिणाम होतो. या सर्व प्रक्रियेचा फटका बसतो तो रोजगार कमी झाले, गुंतवणूक थांबली आणि नफा घटला की कंपन्या सर्वप्रथम मनुष्यबळावर गदा आणतात.

# 'किंग ऑफ द नॉर्थ'पर्व



दिल्लीत 'कॉकरॉच पार्टी'च्या गदारोळाची चर्चा सुरू असताना एका महत्त्वाच्या राजकीय घडामोडीकडे वृत्तपत्रांचे तुलनेने कमी लक्ष गेले. ती घटना म्हणजे ब्रिटनच्या पंतप्रधानपदी अँडी बर्नहॅम यांची झालेली निवड. ५६ वर्षीय अँडी बर्नहॅम हे ब्रिटनचे पंतप्रधान बनलेले गेल्या दशकातील सातवे नेते ठरले. ब्रिटनच्या घटनात्मक व्यवस्थेनुसार प्रत्येक वेळी सार्वत्रिक निवडणूक घेऊनच पंतप्रधान बदलण्याची आवश्यकता नसते. सत्ताधारी पक्षाकडे बहुमत कायम असेल, तर पक्षांतर्गत बदलातूनही नवा नेता निवडला जाऊ शकतो. लेबर पार्टीकडे संसदेत बहुमत होते; मात्र पंतप्रधान कीर स्टार्मर यांचा पक्षातील संसदीय सहकाऱ्यांचा पाठिंबा हळूहळू कमी होत गेला. पक्षांतर्गत नाराजी वाढल्याने अखेर स्टार्मर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला आणि त्यांच्या जागी अँडी बर्नहॅम यांची निवड झाली. मात्र हा केवळ नेतृत्वबदल नव्हता. स्टार्मर यांच्या काही धोरणात्मक निर्णयांमुळे लेबर पार्टीचा जनाधार कमी होत असल्याची भावना पक्षातील अनेक नेत्यांमध्ये निर्माण झाली होती. त्यांच्या कार्यकाळातील अनेक निर्णयांवर टीका झाली आणि पक्षातील अनेक राजकारण्यांचा त्यांच्यावरील विश्वास डळमळीत झाला. याच पार्श्वभूमीवर अँडी बर्नहॅम यांची निवड ही लेबर पार्टीमध्ये नव्या दिशेचा प्रयत्न म्हणून पाहिली जात आहे. अर्थात, बर्नहॅम यांची पंतप्रधानपदी झालेली निवड ही सहजसाध्य नव्हती. 'किंग ऑफ द नॉर्थ' म्हणून ओळखले जाणारे बर्नहॅम हे गेल्या चार वर्षांतील ब्रिटनचे पाचवे पंतप्रधान आहे. मात्र, त्यांच्यासमोर असलेली आव्हाने अत्यंत व्यापक आणि गंभीर आहेत. बर्नहॅम यांच्यासमोरील प्रमुख आव्हान म्हणजे देशाची ठप्प झालेली अर्थव्यवस्था. 'स्टॅग्नंट इकॉनॉमी' म्हणजे अशी अवस्था, ज्यामध्ये आर्थिक विकासाचा वेग अत्यंत मंदावतो. अशा परिस्थितीत नवीन रोजगारनिर्मिती कमी होते आणि नागरिकांच्या जीवनमानावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. ब्रिटनमध्ये २00८ पासून सुरू असलेल्या या आर्थिक अडचणींमुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. बर्नहॅम यांच्यासमोर अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणे, रोजगाराच्या संधी वाढवणे आणि नागरिकांचा विश्वास पुन्हा मिळवणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. ब्रिटनमधील नागरिक वाढत्या करांच्या ओझ्यापासून दिलासा मागत आहेत. त्यामुळे नव्या नेतृत्वासमोर कर धोरण आणि अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचे मोठे आव्हान आहे. सध्या ब्रिटनची अर्थव्यवस्था मंदावलेली आहे. उत्पन्नातील वाढती दरी, बाजारपेठांवरील दबाव आणि जीवनमानातील घसरण या समस्या सरकारसमोर उभ्या आहेत. या आव्हानांना बर्नहॅम यांना प्रभावीपणे सामोरे जावे लागेल. नागरिकांचे खालावलेले जीवनमान सुधारायचे आहे, मात्र त्याच वेळी प्रमुख कर वाढवण्याचे टाळण्याचे कठीण संतुलन साधावे लागणार आहे. अमेरिकेच्या भूमिकेचे केवळ अनुकरण न करता पश्चिम आशिया आणि युक्रेन युद्धासारख्या मुद्द्यांवर स्वतंत्र आणि स्पष्ट भूमिका घेण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. याशिवाय ब्रिटनमधील राजकीय अस्थिरता संपवून देशाला स्थिर सरकार देणे हे त्यांच्यासाठी सर्वात मोठे आव्हान आहे. गेल्या दशकात ब्रिटनने सात पंतप्रधान पाहिले आहेत. त्यामुळे केवळ क्षमायाचना करण्यापेक्षा नागरिकांना सरकारकडून तातडीने आणि ठोस परिणामांची अपेक्षा आहे. सरकारमध्ये विकेंद्रीकरण आणण्याची गरज बर्नहॅम यांनी ओळखली आहे. स्थानिक पातळीवर अधिकारांचे हस्तांतरण आणि प्रशासन अधिक प्रभावी बनवणे हे त्यांच्या पुढील धोरणातील महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. स्टार्मर यांच्या सरकारसमोर जी आव्हाने होती, त्यांच प्रकारची आव्हाने बर्नहॅम यांच्यासमोरही आहे. मंद अर्थव्यवस्था, वाढता जीवनावश्यक खर्च आणि ताणलेली सार्वजनिक सेवा व्यवस्था. या सर्व समस्यांवर ठोस उपाय शोधणे आवश्यक आहे. पश्चिम आशिया आणि युक्रेन युद्धासंदर्भातील धोरणात्मक गोंधळ दूर करून स्पष्ट दिशा देणेही त्यांना गरजेचे आहे. ७ कोटी नागरिकांच्या देशाचे नेतृत्व करणे ही अत्यंत मोठी जबाबदारी आहे. आर्थिक पुनरुज्जीवन, राजकीय स्थैर्य आणि लोकांचा विश्वास परत मिळवणे हेच बर्नहॅम यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी ठरणार आहे. बर्नहॅम यांच्याकडे आलेली ब्रिटनची अर्थव्यवस्था अनेक गंभीर आव्हानांना सामोरी जात आहे. काही काळ वेगाने वाढणारी ब्रिटनची अर्थव्यवस्था आता मंदावण्याच्या दिशेने जात असल्याचे दिसत आहे. यामागे अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे कोविड-१९ महामारीनंतर निर्माण झालेले आर्थिक संकट. या काळात सरकारवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढला, ज्याचा परिणाम सार्वजनिक अर्थव्यवस्थेवर झाला. ब्रिटनच्या कल्याणकारी योजनांवरील खर्चातही मोठी वाढ झाली. कामगारवर्गासाठी आणि बेरोजगार तरुणांसाठी दिल्या जाणाऱ्या विविध लाभांवर सरकारला मोठा खर्च करावा लागत आहे. याशिवाय वृद्ध लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणामुळे निवृत्तिवेतन आणि आरोग्य सेवांवरील खर्चही वाढला. ब्रिटनमधील नागरिकांचे वाढलेले आयुर्मान हे यामागील एक प्रमुख कारण आहे. या खर्चावर नियंत्रण मिळवणे हे बर्नहॅम यांच्यासमोरील महत्त्वाचे आव्हान असेल. यासोबतच गेल्या काही वर्षांत युरोप आणि इतर भागांतील अस्थिरता, युद्धे, आर्थिक अडचणी, दुष्काळ आणि हवामान बदलामुळे अनेक लोकांनी ब्रिटनमध्ये स्थलांतर केले. स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक रोजगार, सार्वजनिक सेवा आणि सरकारी खर्चावर दबाव वाढल्याची भावना ब्रिटनमधील काही वर्गांमध्ये निर्माण झाली. बर्नहॅम यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटन महत्त्वाच्या राजकीय आणि आर्थिक वळणावर आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण करून स्थानिक सरकारांना अधिक अधिकार देणे, प्रादेशिक विकासाला चालना देणे आणि सार्वजनिक सेवांची कार्यक्षमता वाढवणे ही त्यांच्यासमोरील प्रमुख आव्हाने आहेत. अमेरिका, जर्मनी आणि भारतासारख्या अर्थव्यवस्थांशी स्पर्धा करत आर्थिक विकास, खर्च नियंत्रण आणि नागरिकांवरील भार कमी करणे यावर त्यांना भर द्यावा लागेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# हवे हिरवे छत्र

असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच–त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो. भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच 'विकास' आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.

मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष–प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते.




प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे. जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८०–वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष–प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे.

अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे. यावर कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. अशी शहरे जिथे शतावर्षीय वटवृक्ष शाळेसाठी अडथळा नसतो, तर ती सर्वात मौल्यवान संपत्ती असते. शहरे वाढत राहणार आहेत.

पण ती वाढ झाडांच्या विरोधात नसून त्यांच्या सहजीवनातून व्हायला हवी. 'वाढती शहरे, हिरवे छत्र' ही केवळ घोषणा नाही; ती भविष्यातील शहरांची रचना आहे. अशी शहरे जिथे पायाभूत सुविधा प्रकल्पांचा पहिला प्रश्न कोणती झाडे काढायची? असा नसून कोणती झाडे वाचवता येतील? असा असेल. मुंबई या बदलाचे नेतृत्व करू शकते आणि करायलाच हवे.

पान १ वरून

## ७ सप्टेंबर रोजी

लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

पान १ वरून

## मराठा–कुणबी

निराकरण हेल्पलाइन कक्षामार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये विशेषतः उपलब्ध अभिलेखांमध्ये कुणबी, मराठा–कुणबी, कुणबी–मराठा किंवा कुणबी जातीच्या नोंदी आढळल्यास त्याबाबत आवश्यक मार्गदर्शन नागरिकांना केले जाणार आहे. तसेच संबंधित नोंदी व पुराव्यांच्या आधारे पात्र नागरिकांना प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेत सहकार्य व मार्गदर्शन करण्यात येणांर आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत हेल्पलाइन कक्षात ˙उपस्थित राहून, नागरिकांकडून कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणे, उपलब्ध अभिलेखांची नोंद घेणे, आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे तसेच सेवे संबंधी बाबींमध्ये आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य करणार आहेत. तसेच हेल्पलाईनवर प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या शंका व अडचणींचे योग्य प्रकारे निराकरण करून, आवश्यकतेनुसार संबंधित विभाग/अधिकाऱ्यांशी समन्वय साधून कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. याकरीता जिल्ह्यातील नागरिकांनी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे व पुरावे घेऊन हेल्पलाइन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मंराठा–कुणबी, कुणबी–मराठा व कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भात माहिती, मार्गदर्शन अथवा अडचणींसाठी हेल्पलाइन क्रमांक ०२४८२–२२३१३२ वर संपर्क साधवा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

पान १ वरून

## जालना–वाटूर राज्य

तसेच मालवाहतूक करणारी वाहने धावत असतात. परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार, व्यावसायिक आणि विविध गावांतील नागरिकांसाठी हा मार्ग दळणवळणाचा प्रमुख आधार आहे. मात्र, राज्य महामार्ग क्रमांक ७२२१ वरील जालना ते वाटूर दरम्यानच्या रस्त्याची सध्या अत्यंत खराब अवस्था झाली आहे.






# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५० ई-बसेसचे लोकार्पण

नाशिक : नाशिक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पीएम ई–बस सेवा योजनेंतर्गत ५० ई–बसेसचे नाशिककरांच्या सेवेत दाखल होत आहेत. या बसेसच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. नाशिक शहरासाठी दाखल झालेल्या ५० ई–बसेसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री गिरीष महाजन, महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर–आडके, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. केंद्र शासनाच्या पीएम ई–बस सेवा योजनेंतर्गत नाशिक शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ मीटर लांबीच्या ५० ई–बसेस शहरात दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आधुनिक ई–बसेसचा समावेश झाल्यामुळे नागरिकांना



विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासही हातभार लागणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. डिझेल बसेसच्या तुलनेत ई–बसेसच्या वापरामुळे परिचालन खर्चातही बचत होणार आहे. नाशिक शहराचा विकास आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यात आणखी बसेस उपलब्ध होणार असून त्यातून नागरिकांना अधिक व्यापक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नाशिक त्र्यंबकेश्वर येथे दर बारा वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे उदघाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली. रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्स आणि नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदक्षिणा हॉलमधील डॉ. सुनंदा म.गोसावी आर्ट गॅलरीत आजपासून छायाचित्र प्रदर्शन सुरू झाले. ते ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. प्रदर्शनात सिंहस्थ कुंभमेळ्यांतील दुर्मिळ, अप्रकाशित छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. १९३२ पासूनच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ऐतिहासिक आठवणींचा अमूल्य ठेवा या छायाचित्रांमधून उलगडला आहे. बदलते नाशिक, साधू–संतांचे आखाडे, शाही स्नानाची परंपरा, भाविकांचा महासागर, धार्मिक विधी, तत्कालीन सामाजिक जीवन, कुंभमेळ्याचे बदलते स्वरूप या छायाचित्रांतून पाहावयास मिळणार आहे.

## जाहिर प्रगटन

तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, मौजे पाथरवाला खुर्द ता. अंबड जि. जालना येथील जमीन गट कं. ३१, क्षेत्र १ हे. ६२ आर या जमीनीच्या दक्षिण बाजुला असलेली चारी म्हणजे शासनाची जलवाहीनी कं. १७ व जलवाहिनीच्या दक्षिणेस व उत्तरेस शासनाने संपादीत केलेली मोकळी जागा अनुक्रमे २ मी व ५ मीटर व जलवाहिनीची ३० ु २१५ फुट तसेच शासनाच्या डांबरी रस्त्याच्या उत्तरेकडील ४० ु २१५ फुट ही जागा लताबाई भ्र. अनिल हर्षे रा. पाथरवाला खुर्द ता. अंबड यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली आहे तसेच उपविभागीय अभियंता बांधकाम विभाग ता. अंबड जि. जालना यांना माहित असून सुध्दा लताबाई भ्र. अनिल हर्षे व त्यांच्या कुटूंबीयांनी गावठाण वशासकीय सहान जागा ताब्यात घेतली आहे त्यामुळे रहदारीस अडथळा येत असून जलवाहनीतील पाण्याचा सुध्दा योग्य पध्दतीने उर्वरीत शेतकरी यांना उपभोग घेता येत नाही व त्यांनी दोन उपजलवाहिनी नष्ट केल्या आहेत, करीता जाहिर प्रगटन देणार १. गंगाधर हरीश्चंद्र मरकड, २. पांडूरंग भाबूराव सुडके, ३. गोकुळ लक्ष्मण घाडगे, सर्व रा. पाथरवाला खुर्द ता. अंबड जि. जालना व ४. अब्दुल गफुर उमर शेख रा. गोंदी ता. अंबड जि. जालना या सर्वांनी मा. जिल्हाधिकारी जालना, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर उत्तर पैठण ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर तसेच ग्राम विस्तार अधिकारी पाथरवाला खुर्द व लताबाई अनिल हर्षे यांच्या विरूध्द सदरील जागा जी लताबाई हर्षे यांनी ताब्यात ठेवली आहे ती जागा सर्व नागरीकांच्या वापरासाठी मोकळी करून द्यावी याकरीता प्रतिनिधीक (Representive) स्वरूपाचा दावा वरिष्ठ न्यायालय अंबड येथे दाखल करणार आहेत यासंबंधी कोणत्याही व्यक्तीस काही आक्षेप असल्यास त्यांनी ॲड. आर. आर. कुलकर्णी अंबड फोन कं. ९४२२२१६१२७ यांचेशी तसेच १. गंगाधर हरीश्चंद्र मरकड, २. पांडूरंग भावूराव सुडके, ३. गोकुळ लक्ष्मण घाडगे, सर्व रा. पाथरवाला खुर्द ता. अंबड जि. जालना व ४. अब्दुल गफुर उमर शेख रा. गोंदी ता. अंबड जि. जालना यांचेशी सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात कळवावे, करीता हे जाहिर प्रगटन दावा दाखल करण्यापुर्वी प्रसिध्द करण्यात आले आहे.

मार्फत
ॲड.आर.आर.कुलकर्णी
अंबड

जाहिर प्रगटन देणार
१. गंगाधर हरीश्चंद्र मरकड
२. पांडूरंग भावूराव सुडके
३. गोकुळ लक्ष्मण घाडगे
४. अब्दुल गफुर उमर शेख

पान ४ वरून...

## जालनासह मराठवाड्यात भीषण

तातडीने कृत्रिम पाऊस पाडणे काळाची गरज बनली आहे. यापूर्वी २०२४ मध्ये सोलापूर, बीड आणि जालन्यात कृत्रिम पाऊस पाडण्यात आला होता. सध्या आकाशात ढग जमून येत असून पाऊस पाडण्यासाठी ढगांची मुबलकता देखील आहे. त्यामुळे शासनाने प्रथम प्राधान्याने कृत्रिम पाऊस पाडण्याचे नियोजन तातडीने करावे, अशी आग्रही विनंती आमदार खोतकरांनी केली आहे.

## एसआयआरच्या पुढील

केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमध्ये समन्वय ठेवावा. मतदार यादीतील नोंदींमध्ये झालेल्या बदलांबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती द्यावी. तसेच नाव समाविष्ट करणे, आवश्यक दुरुस्ती करणे किंवा नियमानुसार वगळण्याच्या प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शन करावे. यावेळी एसआयआरच्या पुढील टप्प्यात पात्र मतदारांची नावे मतदार यादीत कायम राहतील तसेच दावे व हरकतींची प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण होईल, यासाठी जिल्हानिहाय यंत्रणा सज्ज ठेवावी. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांनी आपले नाव तपासून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करावी. तसेच अनमॅप्ड मतदारांच्या प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.

नोटीस बजावणे, कागदपत्रांचे संकलन आणि प्राथमिक पडताळणीसाठी स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पद्धत स्वीकारावी. पात्र मतदारांचे उपलब्ध मोबाईल क्रमांक, फोटो ओळखपत्र तसेच इतर वैध ओळखपत्रांच्या माध्यमातून संपर्क व पडताळणीची प्रक्रिया सुलभ करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबतीत इतर राज्यांमध्ये अवलंबिलेल्या चांगल्या पद्धतींचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करता येईल, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांचे दावे, हरकती तसेच तक्रारींची तातडीने दखल घेऊन संबंधितांची आवश्यक कागदपत्रे पडताळावीत. पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट करण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करावी, अशी सूचना करून प्रत्येक भारतीय नागरिकाचा मतदानाचा हक्क अबाधित राखण्यासाठी निवडणूक आयोग कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. एसआयआरच्या पहिल्या टप्प्यात निवासी स्थितीची पडताळणी करण्यात आली असून, पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादी, दावे–हरकती, सुनावणी आणि त्यावरील पुढील कार्यवाहीचे नियोजन आवश्यक आहे. नागरिकत्व असलेल्या नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. मतदार नोंदणीची प्रक्रिया अधिक व्यापक करण्यासाठी नव्याने पात्र झालेल्या युवकांच्या नोंदणीसाठी विशेष जनजागृती करावी. महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये आणि मतदार साक्षरता मंचांच्या माध्यमातून जनजागृती उपक्रम राबवावेत. निवडणूक प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून नागरिकांना अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले. प्रारंभी सहाय्यक आयुक्त श्रीमती मिसकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, हिंगोली, धाराशिव व नांदेड या सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आणि त्यांच्या पथकांनी निर्धारित कालावधीत एसआयआरच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण केल्याचे सांगितले. यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या कामकाजाची माहिती दिली. हाऊस–टू–हाऊस सर्व्हे, एन्यूमरेशन फॉर्मचे वितरण व संकलन, मतदार नोंदींचे मॅपिंग व डिजिटलायझेशन तसेच अनमॅप्ड, अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंद असलेल्या मतदारांची पडताळणी याबाबत जिल्हानिहाय सद्यस्थिती त्यांनी सादर केली. पुढील टप्प्यातील नियोजनाची माहितीही त्यांनी दिली.

# जालना शहरातील नागरिकांचा प्रवास होणार आणखी सुलभ; राजमाता जिजाऊ बस लोकार्पण सोहळा आ.अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते पार पडला

जालना, दि. २८ ऑगस्ट : जालना शहरातील नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आरामदायी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जालना शहरासाठी राजमाता जिजाऊ बस उपलब्ध करून देण्यात आले असून, या बसच्या लोकार्पणाचा सोहळा शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जालना शहरातील नागरिकांसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम व्हावी, शहरातील विविध भागांमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांना सुलभ आणि परवडणारी सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्याचे परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक यांच्याकडे राजमाता जिजाऊ बस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या या मागणीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मान्यता दिली. त्यानंतर जालना शहरातील नागरिकांच्या सेवेसाठी राजमाता जिजाऊ बस उपलब्ध करून देण्यात आली आहे. या बससेवेमुळे जालना शहरातील विविध भागांतील नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दैनंदिन कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा





दिलासा मिळणार आहे. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, नागरिकांचा प्रवास अधिक सोयीस्कर होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. राजमाता जिजाऊ बसच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहराच्या विकासासह नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे नमूद केले. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे जालना शहरातील नागरिकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले. राजमाता जिजाऊ बस जालना शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भर ठरणार असून, नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ करण्यास या सुविधेचा मोठा फायदा होणार आहे. यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, नगरसेविका दर्शना झोल-खोतकर, मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक अश्विन आंबेकर, नगरसेवक संजय डुकरे पाटील, नगरसेवक अमोल ठाकूर, नगरसेवक दीपक राठोड, नितीन जांगडे, सपकाळ मैडम (डी. सी), जफर खान, संतोष रासवे, स्वप्नील भास्कर, अजिंक्य जैवळ, बसस्थानक प्रमुख अनिल राठोड, सरफराज खान, शेख मुजाहेद, अभिषेक काबलिये, नजीर शेख, अच्युतराव कदम, देवेंद्र बुंदेले, बिलाल सौदागर, यांच्यासह जालना आगार अधिकारी, कर्मचारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# राख्यांच्या रंगीबेरंगी दुनियेतून जपला बंधुभावाचा संदेश

## यश इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधन उत्साहात; विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेल्या राख्यांचे भरविले आकर्षक प्रदर्शन

सातोना, दि. २८ ऑगस्ट २०२६ : सातोना येथील यश इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी 'माझी राखी, सुंदर राखी' या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून तयार केलेल्या सुंदर, रंगीबेरंगी व आकर्षक राख्यांचे शाळेत प्रदर्शन भरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. शामीर शेख सर उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. मुख्याध्यापक शेख सर यांनी विद्यार्थ्यांना देशात विविध सण-उत्सव का साजरे केले जातात आणि त्यामागील सामाजिक व सांस्कृतिक उद्देश काय असतो, हे सोप्या व प्रभावी शब्दांत समजावून सांगितले. रक्षाबंधन







हा भाऊ-बहिणीच्या पवित्र प्रेमाचा, आपुलकीचा आणि अतूट नात्याचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून प्रेम, बंधुभाव, परस्पर आदर, सहकार्य आणि कुटुंबातील नात्यांची जपणूक करण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे शेख सर यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले. विद्यार्थ्यांनी भाऊ-बहिणीचे नाते प्रेमाने व आदराने जपावे, एकमेकांना मदत करावी, सुख-दुःखात सहभागी व्हावे तसेच आपापसात भांडण न करता प्रेमाने वागावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी कु. नंदिनी आकात, कु. ईश्वरी बहिवाल व ऋषभ दांगट या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व आपल्या मनोगतातून स्पष्ट केले. 'माझी राखी, सुंदर राखी' या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध टाकाऊ वस्तू, रंगीत दोरे, पाने, डाळी आदी साहित्याचा कल्पकतेने वापर करून स्वतः च्या हाताने राख्या तयार केल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या हस्तनिर्मित राख्यांचे आकर्षक प्रदर्शन पाहण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कल्पकता व कलागुणांना वाव मिळाला. तसेच 'टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ व सुंदर वस्तू तयार करता येतात' हा पर्यावरणपूरक संदेशही विद्यार्थ्यांना मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभागाच्या वतीने पालकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभार मानण्यात आले. विद्यार्थ्यांना राखी निर्मितीसाठी पालकांनी दिलेले प्रोत्साहन व मार्गदर्शन या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैष्णवी पवार व कु. वैष्णवी डवले या विद्यार्थिनींनी केले, तर समर्थ साखरे याने उपस्थितांचे आभार मानले. सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात, आनंदी व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# जालनासह मराठवाड्यात भीषण दुष्काळसदृश परिस्थिती; 'कृत्रिम पाऊस' पाडा : आ.अर्जुन खोतकरांची मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी

जालना / प्रतिनिधी : जलनासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने पाठ वळवल्यामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून बळीराजावर मोठे संकट ओढवले आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, पिके वाचवण्यासाठी शासनाने तातडीने 'कृत्रिम पाऊस' (उर्श्रीव डशशवळपस) पाडण्याचे नियोजन करावे, अशी आग्रही व तळमळीची मागणी माजी मंत्री तथा आमदार अर्जुन खोतकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. कागदोपत्री आकडेवारी आणि प्रत्यक्षातील वास्तव यात तफावत आमदार अर्जुन खोतकरांनी पत्रात नमूद केले आहे की, शासकीय आकडेवारीनुसार मराठवाड्यात २०% कमी



पाऊस झाल्याचे म्हटले जात असले तरी, प्रत्यक्षात सर्वदूर आणि समान पाऊस झालेला नसल्याने ही आकडेवारी कागदोपत्री ठरत आहे. गतवर्षीच्या तुलनेत निम्मीही पावसाची नोंद झालेली नाही. जालना जिल्ह्यात २३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असली तरी प्रत्यक्षात पाऊस अत्यंत नगण्य झाला आहे. पर्जन्यमापक यंत्रांमधील तांत्रिक बिघाडामुळे चुकीच्या नोंदी होत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

गत ३० जुलैनंतर जालना जिल्ह्यात एकही मोठा पाऊस झालेला नाही. फवारणी केल्यासारखा किरकोळ पाऊस पडत असल्याने खरिपातील पिके माना टाकू लागली आहेत. सोयाबीनसारखे महत्त्वाचे पीक ऐन फुलोऱ्यात असताना पाऊस नसल्याने मोठा फटका बसला आहे. कापूस, मका, तूर, उडीद आणि मूग ही पिके पूर्णपणे संकटात सापडली असून अतिअल्प पावसामुळे पिके हातातून जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. बाजारपेठेवरही याचा प्रतिकूल परिणाम दिसू लागला असून अनेक गावांमध्ये अद्यापही टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. तसेच रानात हिरवा चारा उपलब्ध नसल्यामुळे गुराढोरांच्या पाण्याचा व चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. मराठवाड्यातील खरीप हंगामाची पिके वाचवायची असतील तर (पान ३ वर)

# मनोज जरांगे यांच्या मागण्या मुख्यमंत्री पूर्ण करतील असा विश्वास

मुंबई : मराठा समाजाबाबतचे शासन निर्णय (जीआर) योग्य प्रकारे लागू करण्यामध्ये जर कोणी अधिकारी जाणीवपूर्वक आडकाठी आणत असेल, तर अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, माहिती भाजपचे नेते प्रसाद लाड यांनी शुक्रवारी दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असून त्यांच्या सर्व मागण्या मुख्यमंत्री पूर्ण करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबईत रक्षाबंधन सोहळ्यानंतर माध्यमांशी



संवाद साधताना प्रसाद लाड यांनी मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत भाष्य केले. जरांगे यांनी मुंबईऐवजी अंतरवाली सराटीत उपोषण करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असल्याचे सांगत लाड म्हणाले की, सणासुदीच्या काळात मुंबईत त्रास होऊ नये म्हणून आम्ही त्यांना विनंती केली होती. त्याचा त्यांनी मान राखला. राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण जीआर काढले आहेत, परंतु प्रशासकीय पातळीवर काही ठिकाणी तफावत राहिल्यामुळे हे आदेश ग्रामीण भागातील तळागाळापर्यंत पूर्णपणे पोहोचू शकले नाहीत, हे त्यांनी मान्य केले.

मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला स्पष्ट निर्देश दिले असून, जे अधिकारी चुकीच्या पद्धतीने काम करत आहेत किंवा कागदपत्रांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण करत आहेत, त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल, असे लाड यांनी स्पष्ट केले.

# एसआयआरच्या पुढील टप्प्यातील प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व सर्वसमावेशक ठेवा : मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

छत्रपती संभाजीनगर, : विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अर्ज, सूचना व हरकतींवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी सक्षम यंत्रणा सज्ज ठेवावी. मतदार यादीतील नोंदींची पडताळणी, नमुना क्रमांक ६, ७ व ८ मधील अर्जांवर कार्यवाही आणि आवश्यक दुरुस्त्या नियमानुसार पूर्ण करताना प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व नागरिकाभिमुख ठेवावी, असे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभागातील विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाचा श्री. चोक्कलिंगम यांनी स्मार्ट सिटी कार्यालयात



### ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी

एसआयआरच्या सुधारित वेळापत्रकानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना दावे व हरकती दाखल करता येतील. दावे-हरकतींवरील नोटीस बजावण्याची व ते निकाली काढण्याची प्रक्रिया २९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित आठही जिल्ह्यांतील उपजिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. श्री. चोक्कलिंगम म्हणाले, विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाला गती देण्यासाठी मतदार यादीची पाने आणि नोटिसांची छपाई नियोजनबद्ध पद्धतीने वेळेत पूर्ण करावी. यासाठी जिल्हानिहाय नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी विभागातील आठही जिल्ह्यांतील छपाईची कामे, उपलब्ध यंत्रसामग्री, संबंधित संस्थांची क्षमता आणि कामाचे नियोजन यांचा त्यांनी आढावा घेतला. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना व अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित यंत्रणा सक्रिय ठेवावी. एखाद्या नागरिकाचे नाव प्रारूप यादीत आढळून न आल्यास त्याची सध्याची निवासस्थिती तपासून आवश्यकतेनुसार नमुना क्रमांक ६ भरून घेऊन नियमानुसार कार्यवाही करावी. नागरिकांना प्रक्रिया व अर्जांबाबत स्पष्ट आणि सुलभ मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी सांगितले.

प्रारूप मतदार यादीबाबत नागरिकांच्या शंका व सूचनांचे निराकरण करण्यासाठी निवडणूक अधिकारी आणि मतदान (पान ३ वर)

# तळणीत जिओ फायबरचा 'लुटारू' कारभार!

## नेटवर्कचा पत्ता नाही, पण पैशांची नियमित वसुली; त्रस्त ग्राहक आक्रमक, सचिन सरकटेंचा थेट ग्राहक मंचाचा इशारा

तळणी (विशेष प्रतिनिधी):ग्रामीण भागात हाय-स्पीड इंटरनेट आणि डिजिटल क्रांतीच्या मोठ्या वल्गना करणाऱ्या 'जिओ फायबर' (गळे ऋळलशी) कंपनीचा तळणी (ता. मंठा) येथे अत्यंत फसवणूक करणारा कारभार समोर आला आहे. पैसे घ्यायचे पूर्ण आणि सेवा द्यायची शून्य, अशा लुटारू धोरणामुळे तळणीतील ग्राहक पुरते त्रस्त झाले असून, कंपनीविरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तळणी परिसरातील अनेक व्यावसायिक, विद्यार्थी आणि नागरिकांनी ऑनलाईन कामे सुरळीत व्हावीत म्हणून जिओ फायबरचे कनेक्शन





### लुटारू वृत्तीविरोधात आंदोलन उभारू

आम्ही व्यवसायासाठी आणि दैनंदिन कामांसाठी विश्वासाने हे कनेक्शन घेतले. पण जिओ फायबरची सर्व्हिस म्हणजे ग्राहकांची उघड-उघड आर्थिक लूट आहे! दरमहा नियमित पैसे भरूनही आम्हाला सेवा मात्र शून्य मिळते. ग्राहक सेवेशी संपर्क साधल्यास केवळ ठरलेली पोकळ आश्वासने दिली जातात. सेवा देता येत नसेल, तर लोकांचे पैसे कशासाठी उकळता? कंपनीने हा मनमानी कारभार थांबवून आमची अडचण त्वरित दूर करावी, अन्यथा सर्व त्रस्त ग्राहकांना एकत्र करून आम्ही याविरोधात ग्राहक मंचाकडे (Consumer Court) दाद मागू आणि जिओच्या कारभाराविरुद्ध तीव्र आंदोलन उभारू.

सचिन सरकटे

घेतले. मात्र, महिनाभर पूर्ण रिचार्ज वसूल करूनही

### ग्रामस्थ अन् व्यावसायिकांचे मोठे नुकसान

इंटरनेट सेवेतील या सततच्या खंडामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण, डिजिटल व्यवहार आणि स्थानिकांचे व्यापार ठप्प होत आहेत. कंपनीने तात्काळ ही समस्या न सोडवल्यास तहसील कार्यालय आणि जिओच्या मुख्य कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशारा तळणीतील त्रस्त ग्रामस्थांनी दिला आहे.

दिवसातील कित्येक तास इंटरनेट पूर्णपणे बंद असते. नेटवर्कचा पत्ता नसणे, वारंवार स्पीड ड्रॉप होणे आणि तक्रार निवारण केंद्राकडून (Customer Care) कोणताच प्रतिसाद न मिळणे, हा रोजचाच प्रकार बनला आहे.

# बंजारा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या संघर्ष योद्ध्यांचा कळंबोली येथे भव्य सत्कार

कळंबोली । मुंबई : बंजारा समाजाच्या अनुसूचित जमाती आरक्षणाच्या हक्कासाठी जालना येथे सलग आठ दिवस तीव्र आमरण उपोषण करणारे संघर्षयोद्धा एकनाथ चव्हाण आणि त्यांचे सहकारी मंगेश राठोड यांचा मुंबईहून परतताना कळंबोली येथे भव्य सत्कार करण्यात आला.श्री संत सेवालाल महाराज मंडळाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात संघर्ष योद्ध्यांचा अत्यंत सन्मानपूर्वक आणि उत्साहात नागरी सत्कार करण्यात आला. समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आणि आरक्षणाच्या मागणीसाठी



प्राणांची पर्वा न करता अहोरात्र संघर्ष करणाऱ्या या योद्ध्यांचा सन्मान करणे ही प्रत्येक समाजबांधवासाठी अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब ठरली आहे.त्यांच्या या ऐतिहासीक संघर्षामुळे संपूर्ण बंजारा समाजबांधवांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले असून,आरक्षणाच्या लढ्याला नवी दिशा व ऊर्जा मिळाली आहे. या सत्कार सोहळ्याला श्री संत सेवालाल महाराज मंडळाचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी उपस्थित प्रमुख मान्यवर:गणपत राठोड,भगवान पवार,गणेश आडे,सचिन चव्हाण उपस्थित होते.

उपसस्थीत मान्यवरांनी उपोषणकर्त्यांच्या धैर्याचे आणि त्यागाचे कौतुक करत समाजाच्या हक्काच्या आरक्षणासाठी झटणाऱ्या प्रत्येक संघर्षयोद्ध्याला मानाचा मुजरा अर्पण केला. यावेळी बोलताना उपस्थितांनी व्यक्त केले की,समाजाच्या एकजुटीच्या,संघटित शक्तीच्या आणि या अथक संघर्षाच्या बळावर बंजारा समाजाला जोपर्यंत न्याय आणि हक्काचे आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत समाज शांत बसणार नाही.या सोहळ्यामुळे कळंबोली परिसरातील बंजारा समाजात अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला.